महाराष्ट्र शासन
ग्रामविकास विभाग,
बांधकाम भवन,२५, मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई-४०० ००१.
Email ID: itcell-rdd@mah.gov.in

क्र : आससेक्रें -५०२५/प्र.क्र.१०५/मातंक दिनांक : ०४/०८/२०२५.

**प्रति,**
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद.

**विषय** :- आपले सरकार सेवा केंद्र (ग्रामपचांयत) प्रकल्पांतर्गत केंद्रचालकांचे मानधन अदा करण्यासाठी राष्ट्रीय ग्रामस्वराज अभियान (RGSA), पुणे या कार्यालयाकडे रक्कम जमा करण्याबाबत.

**संदर्भ** :- १. ग्रामविकास विभागाचे परिपत्रक क्र.आसक-२०१७/ प्र.क्र.३२/ आपले सरकार कक्ष, दि. १९ जानेवारी, २०१९ .
२. संचालक, पंचायतराज यांचे दि.०९.०७.२०२५.

विषयांकित प्रकरणी आपणांस कळविण्यात येते की, या विभागाच्या संदर्भ क्र. येथील दि. १९ जानेवारी,२०१९ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये आपले सरकार सेवा केंद्र प्रकल्पांतर्गत देयक संगणक प्रणालीद्वारे देयके अदा करण्याची कार्यपध्दती निश्चित करण्यात आली आहे. त्यानुसार प्रत्येक आगामी आर्थिक वर्षात प्रति केंद्र निश्चित करण्यात आलेली एकूण रक्कम (करासह) आगाऊ स्वरुपात राष्ट्रीय ग्रामस्वराज अभियान,पुणे या कार्यालयाकडे जमा करणे आवश्यक आहे.

२. सद्य:स्थितीत आपले सरकार सेवा केंद्र (ग्रामपंचायत) येथील संगणक परिचालकांचे माहे,मार्च २०२५ अखेरचे मानधन अदा करण्यात आले आहे. अद्यापही अपुऱ्या निधी अभावी त्यांचे एप्रिल,२०२५ पासूनचे मानधन अदा करणे शक्य झालेले नाही. संगणक परिचालकांचे मानधन वेळेत अदा न झाल्यास लोकप्रतिनिधी तसेच संगणक परिचालक संघटनांकडुन सातत्याने पाठपुरावा केला जातो, तसेच यासंदर्भात विधीमंडळात देखील मुद्दे उपस्थित होत असतात.

३. यासंदर्भात संचालक, (पंचायतराज) यांनी त्यांच्या संदर्भ क्र.२ येथील दिनांक ९ जुलै, २०२५ रोजीच्या पत्रात आपले सरकार सेवा केंद्र प्रकल्पासाठी केंद्रचालकांच्या मानधनाकरिता आगाऊ रक्कमा RGSA कडे जमा करण्याबाबत जिल्हा परिषदांना सूचना देऊनही अद्याप सन २०२४-२५ या आर्थिक वर्षातील संपुर्ण रक्कम देखील जमा न झाल्याचे कळविले आहे. याबाबत

संचालक (पंचायतराज) यांचेकडुन सातत्याने जिल्हा परिषदांकडे पाठपुरावा करण्यात येऊनही जिल्हा परिषद बुलढाणा , जळगाव, नाशिक, रायगड व वाशिम या पाच जिल्हा परिषद वगळता इतर सर्व जिल्हा परिषदांकडे सन २०२४-२५ या आर्थिक वर्षातील एकूण रक्कम रु. ८४,७४,२४,१६८/- इतकी थकबाकी शिल्लक असून चालु आर्थिक वर्षात सर्व जिल्हा परिषदांकडून आपले सरकार सेवा केंद्र करीता ( प्रति केंद्र रु.१३,४६३/-) प्रमाणे एकूण रक्कम रु. ३,३५,८७,४९,२४०/- इतकी आगाऊ स्वरुपात जमा करुन घेणे आवश्यक असल्याचे संचालक (पंचायतराज) यांनी कळविले आहे.

वरील बाब विचारात घेऊन संचालक, पंचायतराज यांच्या उपरोक्त पत्रासोबतच्या विवरण पत्रात जिल्हा परिषदनिहाय नमुद केलेली गत वर्षातील थकबाकी व चालू आर्थिक वर्षातील आगाऊ रक्कम एकत्रितपणे राष्ट्रीय ग्रामस्वराज अभियान, पुणे या कार्यालयाकडे तात्काळ जमा करण्याची कार्यवाही सर्व जिल्हा परिषदांनी कृपया करावी. यासंदर्भात लवकरच आढावा बैठक घेणार असुन याबाबत कृपया प्राथम्याने कार्यवाही करावी.

e8398431-8ae7-46d6-b977-48cb939e1eb4

Digitally signed by e8398431-8ae7-46d6-b977-48cb939e1eb4
Date: 2025.08.04 15:20:03 +05'30'

**(प्रशांत पाटील)**

उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत :**

१.संचालक ,पंचायतराज,राष्ट्रीय ग्राम विकास अभियान, शिवाजीनगर, पुणे.

२.उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत), जिल्हा परिषद (सर्व).

३.निवडनस्ती (मातंक)

सत्यमेव जयते
महाराष्ट्र राज्य
राज्य व्यवस्थापन कक्ष - पंचायत राज
साखर संकुल, तळ मजला, साखर आयुक्तालय, शिवाजी नगर, पुणे ४११ ००५ spdmaharashtra@gmail.com
@rgsamaharashtra Rgsa Maharashtra YouTube RGSAMAHARASHTRA rgsamaharashtra Koo @Maharashtrargsa

जा.क्र.रा.व्य.क.पं.रा./कावि/आससेके/प्रलंबित रक्कम/ /२०२५ दि.०९/०७/२०२५

**महत्वाचे**

प्रति,

**मा.उपसचिव,**
**आपले सरकार सेवा केंद्र(ग्रामपंचायत प्रकल्प),**
**ग्रामविकास व पंचायत राज विभाग,**
**बांधकाम भवन,मर्झबन पथ,फोर्ट,मुंबई-३२**

**विषय : आपले सरकार सेवा केंद्र ग्रामपंचायत प्रकल्पाअंतर्गत केंद्रचालकांचे मानधन अदाईसाठी जिल्ह्यांकडुन या कार्यालयाकडे रकमा जमा करणेबाबत.**

**संदर्भ : १. शासन परिपत्रक क्र. आसक-२०१७/प्र.क्र.३२/आपले सरकार कक्ष बांधकाम भवन, मर्झबान पथ,फोर्ट,मुंबई -३२ दि.१९ जानेवारी २०१९**
**२. क्रमांक : पेमेंट ४७१९/प्र.क्र.०७/मातंक/दि.२१/०९/२०२४**
**३. शासन निर्णय क्र.आससेकें-५०२४/प्र.क्र.६६/मातंक बांधकाम भवन,२५ मर्झबान पथ, फोर्ट,मुंबई-०१ दि.१९ सप्टेंबर २०२४**

महोदय,

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, आपले सरकार सेवा केंद्र ग्रामपंचायत प्रकल्प अंतर्गत केंद्रचालकाचे मानधन व इतर अनुषंगिक बाबींचे अदायीसाठी जिल्हा परिषदांकडून या कार्यालयाकडील खात्यामध्ये आगाऊ रक्कमा जमा करणेत येतात,व त्यातुन प्रकल्प अंमलबजावणी एजन्सी यांचेकडून प्राप्त होणाऱ्या INVOICE प्रमाणे या कार्यालयाकडुन केंद्रचालकांचे मानधन प्रत्यक्ष त्यांचे खात्यावर व इतर अनुषंगीक रकमांचे प्रदान करण्यात येते.

केंद्रचालकांच्या मानधनापोटी जिल्ह्यांकडुन आगाऊ रकमा या कार्यालयाच्या खात्यात जमा करण्याबाबत संदर्भ क्र. १ अन्वये सुचना दिलेल्या आहेत.संदर्भ क्र. २ अन्वये शासन स्तरावरुन सुचित करुनही सन २०२४-२५ या वर्षातील संपुर्ण रक्कम या कार्यालयाच्या खात्यावर जमा झालेली नसुन काही जिल्ह्यांकडे मोठ्या प्रमाणात बाकी शिल्लक आहे.या बाबत संबंधीत जिल्ह्यांकडे सातत्याने पाठपूरावा करुन ही रकमा जमा झालेल्या नाहीत. थकबाकीचे सविस्तर विवरण सोबत जोडले आहे.

तसेच सन २०२५-२६ या चालु आर्थिक वर्षासाठी केंद्रचालक यांचे मानधन अदाई व इतर अनुषंगीक रकमांचे प्रदान करणेसाठी जिल्हा निहाय मागणी रक्कम जिल्ह्यांना कळविणे आवश्यक आहे,जेणेकरुन जिल्ह्यांकडून रकमा या कार्यालयाच्या खात्यामध्ये आगाऊ जमा होतील. सबब सन २०२५-२६ या चालु आर्थिक वर्षातील जिल्हा निहाय मागणी दर्शविणारे विवरणपत्र सोबत जोडले आहे.

तरी या सोबत जोडलेल्या विवरणपत्राप्रमाणे २०२४-२५ अखेरची थकबाकी रक्कम व सन २०२५-२६ या चालु वषाची मागणी रक्कम या कार्यालयाच्या खात्यात जमा करणे संदर्भात सर्व जिल्हा परिषदांना सुचना द्याव्यात ही विनंती. सोबत तक्ता जोडला आहे.

(गिरीश भालेराव)
संचालक,पंचायत राज
महाराष्ट्र राज्य,पुणे

# तक्ता

- आपले सरकार सेवा केंद्र ग्रामपंचायत प्रकल्पाअंतर्गत सन २०२५-२६ या वर्षाचा मागणी तक्ता

| अ.क्र | जिल्हा | सन २०२४-२०२५ थकबाकी (आज अखेर ) | सन २०२५-२६ ची मागणी (प्रती केंद्र रु १३४६३) | एकूण मागणी |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1 | Ahilyanagar | 16977473 | 150408636 | 167386109 |
| 2 | Akola | 2338602 | 45720348 | 48058950 |
| 3 | Amravati | 8638487 | 100972500 | 109610987 |
| 4 | Chh.Sambhajinagar | 116803530 | 111473640 | 228277170 |
| 5 | Beed | 23592706 | 113250756 | 136843462 |
| 6 | Bhandara | 3637649 | 122136336 | 125773985 |
| 7 | Buldhana | 0 | 85463124 | 85463124 |
| 8 | Chandrapur | 3021842 | 112927644 | 115949486 |
| 9 | Dhule | 19225038 | 71084640 | 90309678 |
| 10 | Gadchiroli | 2114091 | 82555116 | 84669207 |
| 11 | Gondia | 18683779 | 64137732 | 82821511 |
| 12 | Hingoli | 30643233 | 144269508 | 174912741 |
| 13 | Jalgaon | 0 | 104526732 | 104526732 |
| 14 | Jalna | 54479593 | 118905216 | 173384809 |
| 9 | Kolhapur | 48857981 | 90148248 | 139006229 |
| 16 | Latur | 37097714 | 106303848 | 143401562 |
| 17 | Nagpur | 30857624 | 131668140 | 162525764 |
| 18 | Nanded | 7016323 | 77708436 | 84724759 |
| 19 | Nandurbar | 46853834 | 189666744 | 236520578 |
| 20 | Nashik | 0 | 77546880 | 77546880 |
| 21 | Dharashiv | 49829394 | 79970220 | 129799614 |
| 22 | Palghar | 2627146 | 73992648 | 76619794 |
| 23 | Parbhani | 30483321 | 68661300 | 99144621 |
| 24 | Pune | 33626842 | 150731748 | 184358590 |
| 25 | Raigad | 0 | 88371132 | 88371132 |
| 26 | Ratnagiri | 7678380 | 85140012 | 92818392 |
| 27 | Sangli | 17131111 | 95641152 | 112772263 |
| 28 | Satara | 61558293 | 131345028 | 192903321 |
| 29 | Sindhudurg | 22543799 | 57998604 | 80542403 |
| 30 | Solapur | 46372049 | 126983016 | 173355065 |
| 31 | Thane | 38891094 | 49597692 | 88488786 |
| 32 | Wardha | 20085914 | 58806384 | 78892298 |
| 33 | Washim | 0 | 59129496 | 59129496 |
| 34 | Yavatmal | 45757324 | 131506584 | 177263908 |
|  | **Total** | **847424168** | **3358749240** | **4206173408** |
|  |  |  |  |  |

संचालक, पंचायत राज
महाराष्ट्र राज्य, पुणे